## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- १०४२/२०२१

अपिलार्थी, श्री.स्वप्निल ललित ठाकूर,
ऑफीस नं.८, साईराज बिल्डींग नं.२, श्री मलंग रोड, नांदिवली,
सेंट्रल बॅकेजवळ, कल्याण (पूर्व), ता.कल्याण, जि.ठाणे.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक,
उप अधीक्षक भूमी अभिलेख, कल्याण यांचे कार्यालय,
झुंझारराव मार्केट, झुंझारराव इमारत, ३ रा मजला,
धान्य बाजार, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २२.०७.२०२१**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०९.२०२० | -- | ३१.१२.२०२० | -- |

अपीलार्थीस दि.२५.०९.२०२० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली प्लॉट नं.२६, सर्वे नं.२२९, हिस्सा नं.३/२/२ टिटवाळा, ता.कल्यण, येथील या जागेचा मुल्यांकन अहवालाची साक्षांकित प्रत मिळावी. या विषयाची माहिती न मिळाल्यामुळे आयोगास दि.३०.०३.२०२१ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.०७.२०२१ रोजी **गुगल मिट (Google meet ) ॲप द्वारे ऑनलाईन** सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक, भुमि अभिलेख, कल्याण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक २५.०९.२०२० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. यास्तव दिनांक ३१.१२.२०२० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिल प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आदेश पारित केले नसल्यामुळे त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले की, अपिलार्थीनी माहिती अर्जान्वये "प्लॉट नं.२६, सर्वे नं.२२९, हिस्सा नं.३/२/२ टिटवाळा, ता.कल्यण, येथील या जागेचा मुल्यांकन अहवालाची साक्षांकित प्रत मिळावी." अशा प्रकारची माहिती मागीतली होती.

त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती ही दुय्यम निबंधक, डोंबिवली, ता.कल्याण यांच्यां कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे, अपिलार्थींचा माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) अन्वये दिनांक ०५.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयाकडे हस्तांतर केला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा दि.२५.०९.२०२० रोजीचा माहिती अर्ज दि.०५.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये दुय्यम निबंधक, डोंबिवली, ता.कल्याण यांच्याकडे उशिराने हस्तांतर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) (दोन) अन्वये जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज पाच दिवसांत संबंधित विभागाकडे हस्तांतर करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केले नाही. तसेच सदर अर्ज हस्तांतर केलेल्या पत्रावर कोणतीही पोहोच दिसून येत नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केल्याचे दिसून येत आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, आता विद्यमान



Scanned with CamScanner

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त करुन पुरविणे योग्य होईल.

तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान श्री.सुधाकर भोसले तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भुमि अभिलेख, कल्याण यांनी संबंधित विभागाकडून माहिती प्राप्त करुन **अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भुमि अभिलेख, कल्याण यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २५.०९.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन उशिराने माहिती अर्ज हस्तांतर करुन, जाणूनबुजून माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.संग्राम जोगदंड तथा उप अधीक्षक, भुमि अभिलेख कल्याण यांनी अपीलार्थी यांनी दिनांक ३१.१२.२०२० अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक के आर.१०४२/२०२१ निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(के.एल.बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जुलै, २०२१ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.संग्राम जोगदंड तथा उप अधीक्षक भूमी अभिलेख,
कल्याण, झुंझारराव मार्केट, झुंझारराव इमारत, ३ रा मजला,
धान्य बाजार, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले तथा मुख्यालय सहाय्यक,
उप अधीक्षक भुमि अभिलेख, कल्याण, यांचे कार्यालय,
झुंझारराव मार्केट, झुंझारराव इमारत, ३ रा मजला,
धान्य बाजार, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे.



Scanned with CamScanner